University of Mumbai

Phone – 68320000 /731
Email - ar.bod.ac@fort.mu.ac.in

विद्याविषयक प्राधिकरणे
बैठका व सेवा विभाग
फोर्ट, मुंबई– ४०००३२.

ए.ए.एम.एस/आयसीसी/२०२३–२०२४/११

# परिपत्रक

**विषय :–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने दिनांक २४–२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.

**संदर्भ :–** क्रमांक–युएनआय/(१३६/२२)/विशि–१/भाग–२/८०५६ दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीचे शासनाचे पत्र.

विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व स्वायत्त्त महाविद्यालयाचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, भारत सरकारने दिनांक २९ जुलै, २०२० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जारी केले.

दिनांक २९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करणाऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्ष पूर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये दिनांक २४–२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याचे योजिले आहे.

या दिवशी आपल्या संलग्नित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात सखोल ज्ञान असलेल्या तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात यावे.

तसेच खालीलप्रमाणे उपक्रम/कार्यक्रम घेण्यात यावेत:–

१) **स्पर्धा –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही संकल्पना घेऊन पध्दतीने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्हिडीओज, रिल्स यासारख्या स्पर्धा आयोजित कराव्यात.

२) **जाणीव जागृती –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात ग्रंथालय/महाविद्यालयामध्ये प्रदर्शन आयोजित करणे, रेडियो, टेलिव्हीजनच्या माध्यमातून चर्चा, मुलाखती आयोजित करणे, अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिकांच्या संपादकांबरोबर बैठक आयोजित करून चर्चा घडवून आणणे, यु–टयुब आणि सोशल मिडियांच्या माध्यमांचा वापर करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरण सर्व संबंधित घटकांपर्यंत पोहोचविणे तसेच या माध्यमांचा वापर करून विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे.

मुंबई – ४०००३२
दिनांक – १८ जुलै, २०२३

(डॉ. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२ | ८०५६ दि. 13 JUL 2023

प्रति,

१.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

**विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि.२४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.**

संदर्भ १. शासन निर्णय एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३/शिकाना दि..२० एप्रिल, २०२३
२. शासन निर्णय एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३/शिकाना दि..१६ मे, २०२३
३.संचालनालयाचे समक्रमांक दि.४ जुलै, २०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, भारत सरकारने दि.२९ जुलै, २०२० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जारी केले. महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ.रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक परिषद, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली कार्यबल गट स्थापन करण्यात आला. सदर कार्यबल गटाने शासनास सादर केलेला अहवाल स्वीकृत करुन सदर अहवालातील शिफारसीनुसार ०६ उपसमित्यांचे गठन करण्यात आले.

त्याअनुषंगाने धोरण अंमलबजावणीत येणाऱ्या अडीअडचणी, समस्या इ.च्या निराकरणासाठी सुकाणू समितीचे गठन करण्यात आले.

शासन पत्र दि.१६ जून, २०२३ अन्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंना विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये, आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविल्या जात असलेल्या महाविद्यालयामध्ये शासन निर्णय दि.२० एप्रिल, २०२३ व शासन निर्णय दि.१६ मे, २०२३ नुसार अंमलबजावणी करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

दि.२९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करण्याऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्ष पुर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये **दि.२४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह"** म्हणून साजरा करण्याचे योजिले आहे.

या दिवशी आपल्या विद्यापीठामध्ये तसेच संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात सखोल ज्ञान असलेल्या तज्ञ व्यक्तिचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात यावे. तसेच खालील प्रमाणे उपक्रम/कार्यक्रम घेण्यात यावेत.

**१ स्पर्धा-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही संकल्पना घेऊन पध्दतीने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निंबंध स्पर्धा, व्हिडीओज,रिल्स यासारख्या स्पर्धा आयोजित कराव्यात.

**२.जाणीव जागृती-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात ग्रंथालय /महाविद्यालयामध्ये प्रदर्शन आयोजित करणे, रेडिओ, टेलिव्हीजनच्या माध्यमातून चर्चा, मुलाखती आयोजित करणे, अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिकांच्या संपादकांबरोबर बैठक आयोजित करुन चर्चा घडवून आणणे. यु-टयुब आणि सोशल मिडियांच्या माध्यमाचा वापर करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरण सर्व संबंधित घटकांपर्यंत पोहोचविणे. तसेच या माध्यमाचा वापर करुन विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण दिवस साजरा करण्यासाठी आपल्या विभागातील अकृषि विद्यापीठांचे संबंधित अधिकारी तसेच सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची उपरोक्त नमूद उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी ऑनलाईन/ऑफलाईन बैठक घ्यावी. तसेच सदरील उपक्रमांचे यशस्वीपणे आयोजन केले जाईल याबाबत दक्षता घ्यावी. आयोजित केलेल्या उपक्रमाचा विभागनिहाय अहवाल सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी दि.०३ ऑगस्ट, २०२३ पर्यंत संचालनालयास खास दूतामार्फत हार्डकॉपीमध्ये दोन प्रतीत सादर करावा.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत- माहितीस्तव सादर**

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, सुकाणू समिती , राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०